# परिशिष्ठ-2

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृह यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पदांचा आढावा व आकृतीबंध निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांकः– इडीडी–२००३/प्र. क्र.३४०/भाग–३/सुधार–२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :– ३० जानेवारी, २००६

वाचा:–

१) शासन निर्णय, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी–२००३/ प्र. क्र.३४०/भाग ३/सुधार–२, दिनांक १८ ऑगस्ट, २००४

२) शासन निर्णय, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी–२००५/ प्र. क्र.१४२/भाग २/सुधार–२, दिनांक १८ ऑगस्ट, २००५

३) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/वाई/पदनिर्मिती/न्या.प्र./प्र–४मति/२००५–०६/ ९७५, दिनांक २७/६/२००५ व क्र. १५०९ दिनांक २५/८/२००५.

४) वित्त विभागाचे अ.शा.पत्र क्र.संकीर्ण–१०.०५/प्र. क्र.१७/अर्थोपाय, दिनांक १७/१/२००६.

प्रस्तावना:– स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पदांचा आढावा घेवुन शासन निर्णय दि.१८ ऑगष्ट २००४ अन्वये कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात आलेला नाही. सदर आकृतीबंधापूर्वी अपंगांच्या विशेष शाळा संहिता १९८५ मध्ये विहित करण्यात आलेल्या कर्मचारी आकृतीबंधमध्ये वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात आला होता. त्यानंतर सुधारित अपंगांच्या विशेष शाळा संहिता १९९७ मध्ये प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या आकृतिबंधात फक्त वाहन चालक पदांचा समावेश करण्यात आला तथापि अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी वाहतूकीची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अधिनियमातील तरतूद विचारात घेवुन मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्र. ७८७९/२००४ वर दिलेल्या नियकालात कर्मचारी वर्गाच्या आकृतीबंधात वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात यावा असे निर्देश दिले आहे तसेच केंद्र शासनामार्फत अपंगांच्या संस्थांना अनुदान दिले जाते अशा संस्थांमध्ये वाहन चालक व वाहन परिचर हें कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केले जातात. त्यावर होणाऱ्या खर्चासाठी केंद्र शासनामार्फत अनुदान दिले जाते. या सर्व बाबी विचारात घेऊन शासनाने शासन निर्णय दि.१८ ऑगष्ट २००४ अन्वये विवित केलेल्या आकृतीबंधात, ज्या संस्थाकडे अनिवासी अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांसाठी स्वतःचे वाहन आहेत, अशा संस्थांना वाहन चालक व वाहन परिचर पद मंजूर करता यावे, यासाठी सदर दोन्ही पदांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :– स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यता व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व संलग्न वसतिगृहे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पदांचा शासन निर्णय दि. १८ ऑगष्ट २००४ अन्वये आकृतीबंध निश्चित केलेला आहे. सदर शासन निर्णय सोबतच्या विविरण पत्र अ मधील शाळा विभागातील अनु क्र.९ नंतर खालील पदांचा समावेश करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | विद्यार्थी संख्या | अनुज्ञेय पद | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १० | वाहन चालक | कंत्राटी पध्दतीने दरमहा रु ३,०००/– एकत्रित वेतन | प्रत्येक शाळा/कर्मशाळेस एक | १ | स्वत:चे १६ आसनांचे वाहन असलेल्या फक्त अनिवासी शाळा/कर्मशाळांसाठी |
| ११ | वाहन परिचर | कंत्राटी पध्दतीने दरमहा रु २,०००/– एकत्रित वेतन | प्रत्येक शाळा/कर्मशाळेस एक | १ | स्वत:चे १६ आसनांचे वाहन असलेल्या फक्त अनिवासी शाळा/कर्मशाळांसाठी |

२. या पदांवर होणारा खर्च सन २००५–२००६ या आर्थिक वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यासाठी सदर बाब नागपूर येथे संपन्न झालेल्या विधानमंडळ अधिवेशनात लाक्षणिक पुरक मागणीव्दारे विधान मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आलेला आहे. त्याबाबत महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण, भाग–चार, दिनांक २७/१२/२००५ यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तेव्हा यावर होणारा खर्च चालू आर्थिक वर्षात संबंधीत लेखाशीर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवावा व तो संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौ. सदर्भ क्र. ३४/०६/व्यय–१४, दिनांक २७/१/२००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ज. ना. राठोड)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
४) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा. मुख्य सचिव
६) मा. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
७) मा. सर्व विभागीय आयुक्त
८) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२) सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
१३) सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१४) सर्व समाज कल्याण अधिकारी, गट– अ, जिल्हा परिषद
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र–१/२, मुंबई/नागपूर
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) निवड नस्ती – सुधार – २